मंगळवार २१ जानेवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
-ॲड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

# दैनिक लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

RNI-MAHMAR/2023/89402 वर्ष : ०२ अंक :१३२ किंमत २ रुपये | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

# सिंदखेड राजा तालुक्यात बट्याबोळ झालेल्या जल जीवन मिशन कडे जिल्ह्याचे पालकमंत्री लक्ष घालतील का?

## अधिकारी, ठेकेदारांनी लावला साडेचार कोटीला चुना

## वाघजाई येथील सरपंचांना धमकी देणाऱ्या ठेकेदारावर कारवाई साठी सरपंच ग्रामपंचायत सदस्य व गावकरी बसले जलजीवनच्या कार्यालयात ठाण मांडून






**लोकनेता न्युज नेटवर्क सिंदखेड राजा** ज्ञानेश्वर बुधवत :- माननीय पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांच्या संकल्पनेतून पाणीटंचाई असलेल्या गावांची तहान भागवण्यासाठी ८१ कोटी ६५ लाख जल जीवन चे कामे देण्यात आली. मात्र आता मागील पंधरा दिवसांपासून वारंवार या जलजीवन मिशनचे नवनवीन कारनामे समोर येताना दिसते. अद्याप एकही जल जीवन मिशनचे काम पूर्ण झाले नसून तालुका हा तहानलेलाच आहे ८१ कोटी खर्च करून सुद्धा जर तालुका तहानलेला असेल तर याकडे लक्ष कोण घालणार? मागील काही दिवसांपासून अनेक वृत्तपत्रांनी हा विषय ताणून धरला आहे. मात्र जल जीवन मिशनचे कर्मचारी अधिकारी वरिष्ठ अधिकारी याकडे डोळे उघडून बघण्यास तयार नसल्याचे चित्र मात्र सिंदखेड राजा येथे तयार झालेले आहे. जलजीवांच्या ठेकेदारांची दादागिरी, अधिकाऱ्यांच्या गोलमेल, या प्रकाराने आता नागरिक जास्त त्रस्त झाले आहेत, मात्र याकडे कोणीही लक्ष द्यायला तयार नाही या प्रश्नावर बोलण्यास कोणीही तयार नाही अद्याप कामे पूर्ण नसून अधिकारी संबंधितांना तक्रारदारांना वेळ मागत आहे. सद्यस्थितीमध्ये याकडे कोणीही लक्ष घालायला तयार नसून जिल्ह्याचे पालकमंत्री मकरंद जाधव हे या विषयाकडे लक्ष घालतील का? ही माफक अपेक्षा आता सिंदखेडराजा तालुक्यातील त्रस्त नागरिकांनी माध्यमांशी बोलताना व्यक्त केली आहे. ७६ गावांसाठी ८१ कोटींची कामे मंजूर होऊन अद्यापही काम पूर्ण नसून कामे मंजूर झाल्यापासून मागील पाच वर्षांमध्ये पाणीटंचाईचा प्रश्न हा तालुक्यात जोर धरत असताना, मागील पाच वर्षात चक्क चार कोटी ४२ लाख ४६ हजार ९४० रुपये पाणी टंचाईवर शासनाला खर्च करावी लागलेत, यामध्ये जलजीवनची गावेच मोठ्या प्रमाणात सामील असून विहीर अधिग्रहण,व टँकर साठी वरील निधी खर्च करण्यात आला आहे आणि यापुढे जोपर्यंत कामे पूर्ण होत नाही तोपर्यंत शासनाला पाणीटंचाईवर किती खर्च करावा लागेल हा प्रश्न सर्वांच्या मनात धरून आहे. कामे पूर्ण होणारच नसेल पाणी टंचाईचा वेगळा निधी गावावर खर्च करायचा असेल तर जल जीवन मिशन ही योजना कशासाठी? असा सवाल तालुक्यातील जनता करीत आहे.

नुकतेच तालुक्यातील वाघजई येथील सरपंचांनी उपविभागीय अभियंता यांच्याकडे ठेकेदाराने वाघजई गावाची फसवणूक केल्याप्रकरणी फोजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी केली होती त्यानुसार संबंधित ठेकेदाराने वाघजई येथील सरपंच गजानन सानप यांना १७ जानेवारी रोजी धमकी दिली की तुझ्या गावाला एकही थेंब पाणी पुरवठा करणार नसुन तुझ्या अंगावर गाडी घालून जिवे मारण्याची धमकी दिली आहे यासंबंधी सिंदखेडराजा पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल केला आहे.

## मस्साजोग च्या धरतीवर सिंदखेड राजा तालुक्यातील वाघजई येथील सरपंच असुरक्षित

सिंदखेड राजा तालुक्यातील वाघजई येथील सरपंचांनी मागील चार वर्षापासून पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी पाणीपुरवठा अभियंत्याकडे संबंधित योजनेच्या तक्रारी केल्या असल्याने १७ जानेवारी रोजी सरपंच सानप यांना ठेकेदारांनी धमकी देऊन तुला गाडीने उडवेल. आहे तो पर्यंत तुझ्या गावाला पाणी मिळू देणार नाही, अशी भीतीदायक धमकी दिली असून सरपंचांनी पोलीस स्टेशन सिंदखेड राजा येथे धाव घेतली असता सिंदखेड राजा पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद केला आहे. पोलीस स्टेशन सिंदखेड राजा यांनी गुन्ह्याची नोंद घेतली आहे. मात्र मागील एक महिन्यापासून बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा धक्कादायक प्रकार लक्षात घेता संबंधित पोलीस स्टेशन ने तातडीने ठेकेदारावर कारवाई करण्यात यावी. संबंधित ठेकेदाराचे नातलग पोलीस खात्यात वरिष्ठ पदावर असल्याची सूत्रांकडून माहिती मिळाली असून, आता पोलीस खाते देखील कोणाच्या दवाबा खाली न येता काय कारवाई करेल याकडे तालुक्यातील नागरिकांचे लक्ष वेधल्या गेले आहे.जलजीवांच्या भ्रष्ट कामाकडे वरिष्ठ अधिकारी डोळे झाक करत असतील तर तालुक्याचे चित्र हे बीड सारखे होण्यास वेळ लागणार नाही.

## उपविभागीय अभियंत्याची आता पत्रकारांनाही विशेष सूचना

जल जीवन संदर्भात तालुक्यातील पत्रकारांनी उपविभागीय अभियंता मालोकार यांच्याशी चर्चा करून त्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारावर बातमी प्रकाशित केल्यानंतर मालोकार यांनी बातमी लावणा-या पत्रकारांना विशेष सूचना दिली असून, आपण जे कार्यालयात बोलतोय ते पेपर मध्ये जशास तसे छापू नका, असे म्हटले आहेत. चर्चा होऊनहीं जर पत्रकारांनी बातमीमध्ये जलजीवांची मुद्दे मांडायची नसेल तर; जल जीवन मध्ये झालेल्या निकृष्ट कामाबद्दल कोण बोलणार की न बोलता अधिकारी कर्मचारी ठेकेदार संयुक्त विद्यमानाने जलजीवांची योजना अशीच राबवून तालुक्यातील नागरिकांना तहानलेले ठेवणार का? हा प्रश्न नागरिकांच्या समोर उपस्थित झाला आहे.

## देवांश गिऱ्हे जाणार इस्त्रो सहलीवर.



**लोकनेता न्यूज नेटवर्क**

माहूर:प्रतिनिधी सहाव्या इयत्तेत शिक्षण घेणा-या देवांश गिऱ्हे याची इस्रो सहलीसाठी निवड झाली आहे. देवांश हा तालुक्यातील उमरा या छोटया गावातील पंकज गिऱ्हे यांचा मुलगा असून तो यवतमाळ येथिल जवाहरलाल दर्डा एज्युकेशन सोसायटी संचालित यवतमाळ पब्लिक स्कूलचा विद्यार्थी आहे. अभ्यासात सातत्य राखत देवांश गिऱ्हे याने नोबेल फाउंडेशन जळगाव अंतर्गत राज्यस्तरावर एनएसटीएस अर्थात नॅशनल सायन्स टॅलेंट सर्च ऑनलाइन, ऑफलाइन परीक्षेत आणि मुलाखतीत यश संपादन केले आहे. त्यामुळेच त्याची इस्रो सहली करिता निवड झाली आहे. या शैक्षणिक सहलीत तो आयआय-टी गांधीनगर, आयआयएम अहमदाबाद, सायन्स सिटी, साबरमती आश्रम व अक्षरधाम मंदिर इथे भेट देणार आहे.

## माझ्या पुरस्कारामध्ये विद्यार्थी व सहकाऱ्याचेही योगदान - वानोळे

**लोकनेता न्युज नेटवर्क**

वडवणी : बीडच्या मातृभूमी प्रतिष्ठानने राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन माझा जो गौरव केला त्यामध्ये वडवणी तालुक्यातील दुकडेगाव व हरिश्चंद्र पिंपरी येथील माझे विद्यार्थी, पालक, सहकारी शिक्षक, ग्रामस्थ आणि गटशिक्षणाधिकारी यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यांचेही योगदान आहे. प्रथम पासूनच विद्यार्थी हाच केंद्रबिंदू मानून समर्पण भावनेने कार्य केल्याने हे माझ्या विद्यार्थ्यांचा सन्मान असून यापुढेही त्यांची साथ मिळेल या अपेक्षेसह सर्वांच्या ऋणात राहण्याची इच्छा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त दुकडेगाव येथे सहशिक्षक पदावर कार्य केलेले गंगाधर यशवंतराव वानोळे यांनी मदैनिक लोकनेताफला दिली. मातृभूमी प्रतिष्ठानचेही वानोळे यांनी



आभार मानले.

दुकडेगाव येथील रहिवासी तथा प्राथमिक शिक्षक दिनकर बडे यांनी वानोळे यांच्या शैक्षणिक योगदानाबद्दल गावाच्या वतीने सत्कार केला. प्राथमिक शिक्षक वानोळे सर मराठवाड्यात सुपरिचित असून नांदेडचे तत्कालीन जिल्हाधिकारी तथा नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, नांदेडच्या तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी तथा लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, किनवटचे प्रकल्प अधिकारी तथा रत्नागिरी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कीर्तीकिरण पुजार, जालन्याचे उपशिक्षणाधिकारी विपुल भागवत, माजलगावचे गटशिक्षणाधिकारी रवींद्र महामुनी, गटशिक्षणाधिकारी अशोक सोळंके, गटशिक्षणाधिकारी गणेश गिरी, गटशिक्षणाधिकारी एल. बी. बेडस्कर, वडवणीचे गटशिक्षणाधिकारी भीमराव नांदुरकर यांच्यासह अनेकांनी वानोळे यांना शुभेच्छा दिल्या आहेत. महाराष्ट्रभरातून त्यांचे अभिनंदन होत असून शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील सर्वांचे आणि मातृभूमी प्रतिष्ठानचे राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त गंगाधर वानोळे यांनी आभार मानले.

## महात्मा फुले प्राथमिक शाळेत आनंदनगरी कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद.!

### विद्यार्थ्यांनी घेतले व्यवहार ज्ञानाचे धडे



**लोकनेता न्युज नेटवर्क**

कंधार धोंडीबा मुंडे

कंधार येथील महात्मा फुले प्राथमिक शाळेत आनंदनगरी कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला,प्रजासत्ताक दिनानिमित्त दि.२० जानेवारी रोजी कंधार येथील महात्मा फुले प्राथमिक शाळेत आनंदनगरी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या आनंदनगरी कार्यक्रमांचे उद्घाटन संत गाडगेबाबा शिक्षण संस्थेचे सचिव मा.चेतनभाऊ दौलतराव केंद्रे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले,यावेळी महात्मा फुले प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक वाघमारे डी जी यांच्या हस्ते सचिव मा.चेतनभाऊ दौलतराव केंद्रे साहेब यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना चेतन भाऊ केंद्रे यांनी मार्गदर्शन करताना म्हणले की आनंदनगरी खरी कमाई उपक्रमातून बालकांना आर्थिक व्यवहार यासह गणिती व्यवहार समजण्यासाठी उपयुक्त ठरेल असे प्रतिपादन यावेळी त्यांनी केले,राजू केंद्रे यांनी सुत्रसंचलन केले तर आनंदा आगलावे यांनी आभार मानले,सौ उषा कागणे,चंद्रकला तेलंग यांनी परिश्रम घेतले,आनंदनगरी उपक्रमासाठी शिक्षक नेते तथा विद्याविकास प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राजहंश शहापुरे,श्री शिवाजी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक तथा शिक्षक महासंघाचे विभागीय सचिव हरीहर चिवडे , शिक्षक संघाचे कंधार तालुकाध्यक्ष तथा प्रबोधनकार ठाकरे प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक भास्कर पाटील कळकेकर,पालक तथा सामाजिक कार्यकर्त शिवराज कौसल्ये पाटील,के पी नवघरे, मनोविकास प्राथमिक शाळेचे शिक्षक विरभद्र बेलूरे,श्री शिवाजी प्राथमिक शाळेचे शिक्षक मोरे पाटील आदीसह पालकांची विद्यार्थांची उपस्थिती होती,

## बीड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आज राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार

बीड-प्रतिनिधी महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑलिंपिकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांच्या जन्मदिनानिमित्त राज्य क्रीडा दिन व क्रीडा सप्ताहचे आयोजन १५ ते २१ जानेवारी २०२५ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आयोजन केले आहे. २०२४-२०२५ या वर्षी शालेय स्पर्धेत खेळलेले राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा गुणगौरव व सत्कार समारंभ २१ जानेवारी रोजी जिल्हा क्रीडा संकुल बीड येथे आयोजित केलेला आहे. बीड जिल्ह्यातील सर्व खेळाडूंनी किंवा क्रीडा शिक्षकांनी गत वर्षात खेळलेले राष्ट्रीय प्रमाणपत्राची प्रत व आधार कार्ड ची प्रत सह १९ जानेवारी २०२५ पर्यंत रेवणनाथ शेलार (क्रीडा मार्गदर्शक) मो. ९०७५४७६७९१ यांच्याशी संपर्क साधून नोंदणी करावी असे आव्हान अरविंद विद्यागर जिल्हा क्रीडा अधिकारी बीड यांनी केले आहे. बीड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तर्फे २१ जानेवारी २०२५ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागांतर्गत, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तथा जिल्हा क्रीडा परिषद, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑलिंपिकवीर दिवंगत खाशाबा जाधव यांच्या जन्मदिनानिमित्त राज्य क्रीडा दिन व क्रीडा सप्ताहचे आयोजन १५ ते २१ जानेवारी २०२५ जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातर्फे आयोजन केले आहे. २०२४-२०२५ या वर्षी शालेय स्पर्धेत खेळलेले राष्ट्रीय व एकविध क्रीडा संघटने मार्फत आंतरराष्ट्रीय खेळाडूंचा गुणगौरव व सत्कार समारंभ २१ जानेवारी रोजी जिल्हा क्रीडा संकुल बीड येथे आयोजित केलेला आहे. बीड जिल्ह्यातील सर्व खेळाडूंनी किंवा क्रीडा शिक्षकांनी गत वर्षात खेळलेले राष्ट्रीय प्रमाणपत्राची प्रत व आधार कार्ड ची प्रत सह १९ जानेवारी२०२५ पर्यंत रेवणनाथ शेलार (क्रीडा मार्गदर्शक) मो.९०७५४७६७९१ यांच्याशी संपर्क साधून नोंदणी करावी असे आव्हान अरविंद विद्यागर जिल्हा क्रीडा अधिकारी बीड यांनी केले आहे.

## अहो आश्चर्य !

# माजलगाव पं.स.मध्ये घरकुलात दीड लाखाचे हातात पडतात एक लाखच

## ऑपरेटर मगरेची झुंडशाही/हुकूमशाही माजलगाव पंचायत समितीची इज्जत वेशीला

माजलगाव- तालुक्यातील घरकुल योजनेतील लाभार्थ्यांची कुचंबना करणाऱ्या, तसेच लाभार्थ्यांची अडवणूक करत चिरीमिरी साठी अडवणूक करणाऱ्या माजलगाव पंचायत समितीमधील गटविकास अधिकारी, घरकुल अभियंता, घरकुल ऑपरेटर मगरेची मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब चौकशी करतील का? याकडे तालुक्यातील जनतेचे लक्ष लागले असून आशा मगरुर कर्मचाऱ्यांना चौकशी अंती घरचा रस्ता दाखवतील का? गोरगरिबांना स्वतःचे घर असावे म्हणून शासनाने ही महत्वकांक्षी योजना चालू केलेली असून या योजनेत अधिकारी व कर्मचारी खोडा घालत लाभार्थ्यांना घरकुलापासून वंचित ठेवत आहेत. त्यामुळे अनेक लाभार्थ्यांना या गोष्टीचा मनस्ताप होत असून दररोज पंचायत समिती येथे चकरा माराव्या लागत आहेत. परंतु पंचायत समिती माजलगाव येथील अधिकारी कर्मचाऱ्यांना गोरगरीब जनतेचे काही देणे घेणे राहिलेले नाही. स्वतःच्या फायद्यासाठी चिरीमिरी देणाऱ्यांचे येथे कामे होतात. परंतु यामुळे खरे लाभार्थी या योजनेपासून वंचित ठेवले जात असल्याने त्यांना न्याय मिळत नसल्याने पंचायत समिती माजलगाव येथील संबंधित अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब सखोल चौकशी करून कारवाई करत बडतर्फ करतील का? व आशा कामात कसूर करणाऱ्या कर्मचाऱ्यांना घरचा रस्ता दाखवतील का? या कडे सबंध तालुक्यातील जनतेचे लक्ष लागलेले आहे. माजलगाव पंचायत समिती घरकुल विभागात कार्यरत असलेले गटविकास अधिकारी यांच्याकडून घरकुल सारख्या महत्त्वकांविषयी योजनेत खोडा घालून बदनाम करण्याचे काम अनेक दिवसापासून बिनबोभाटपणे चालु आहे. लाभार्थ्यांना घरकुल रेखांकन दिल्यानंतर ६/६ महिने घरकुल अभियंता लाभार्थ्यांकडे फिरकत नाही. लाभार्थ्यांना जरी भेटी दिल्या तरी त्यांच्याकडून चिरीमिरी घेतल्याशिवाय हप्ते टाकले जात नाहीत. त्यामुळे आज ही हजारो लाभार्थी हक्काच्या घरकुलापासून वंचित राहत आहेत. प्रत्येक गावातील लाभार्थी वर्गात प्रचंड असंतोषाची भावना निर्माण झाली आहे. ज्या लाभार्थ्यांनी घरकुल अभियंत्यांना लक्ष्मी दर्शन न दिल्यास सध्या बजेट नाही म्हणून वेळ निभावून नेतात. सर्वसाधारणपणे दीड लाखाच्या रकमेत प्रत्यक्षात घरकुल अभियंता, विस्तार अधिकारी, ऑपरेटर यांना पैसे वाटप करून प्रत्यक्षात एक लाख रुपये शिल्लक राहतात. त्यातून घर कसे बांधायचे असा प्रश्न निर्माण झाल्याने घर बांधणीची लाभार्थ्यांची इच्छा राहत नाही लाभ देत असताना अभियंत्याकडून पात्र, गरजू लाभार्थ्यांना वंचित ठेवण्याचा प्रकार मोठ्या प्रमाणावर झाला असल्याचे स्पष्ट होते. ऑपरेटर मगरेची झुंडशाही/हुकूमशाही माजलगाव पंचायत समितीची इज्जत वेशीला टांगणाऱ्या घरकुल ऑपरेटर मगरेची प्रचंड हुकूमशाही वाढली असून लाभार्थ्याकडून पैसे घेतल्याशिवाय कोणाचेच हप्ते काढले जात नाहीत. गेल्या तब्बल १५ वर्षाहून अधिक काळापासून एकाच ठिकाणी ठाण मांडून बसल्याने त्यांची हिंमत बिनदिक्कतपणे वाढली आहे. गटविकास अधिकारी माजलगाव या मगरेच्या काळ्या कारनाम्याला पाठीशी घालत असल्याने त्याची हिंमत वाढत चालली आहे त्यामुळे लाभार्थ्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. माझे कोणीच वाकडे करू शकत नाही कोणी कमी जास्त केले तर खोटे गुन्हे




दाखल करण्याची धमकी देतो. तरी या तक्रारीची गंभीर दखल घेऊन संबंधिताची सखोल चौकशी करून त्यांना तात्काळ सेवेतून बडतर्फ करण्यात यावे अशी भावना तालुक्यातील जनतेन मधून निर्माण झाली आहे. घरकुलधारकांना न्याय मिळावा यासाठी दि.२३/१/ २५ रोजी जिल्हा कार्यालया समोर लोकशाही मार्गाने बेमुदत आमरण उपोषण करण्यात येणार आहे असे नईम आतार, सोमेश्वर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ
दैनिक लोकनेता
मंगळवार २१ जानेवारी २०२५
epaper.lokneta.in


## संपादकीय

## मुलांच्या स्मार्ट फोन वापरावर बंधने हवीच !

६ वर्षांखालील मुलांना इंटरनेट वापरापासून दूर ठेवणारे विधेयक गेल्यावर्षी ऑस्ट्रेलियाच्या सभागृहात मांडण्यात आले. संसदेतील ११५ सदस्यांपैकी १०२ सदस्यांनी या विधेयकाला पाठिंबा दर्शवला त्यामुळे लवकरच कायदा स्वरूपात ते जनतेसमोर येईल. कायदा करताना त्यामध्ये सामाजिक माध्यमांवरही मर्यादा घालण्यात येणार आहेत. टिकटॉक, फेसबुक, स्नॅपचॅट, रेडिट, एक्स, इंस्टाग्राम या आणि अशा स्वरूपाच्या कोणत्याही सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर १६ वर्षाखालील मुलांना खाते बनवता येणार नाही. या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मकडून सुमारे अडीच अब्ज रुपयांचा दंड आकारला जाणार आहे. काही मोजकी मंडळी सडली तर देशभरातून या विधेयकाचे स्वागत करण्यात येत आहे. लहान मुलांकडून इंटरनेटचा तसेच सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सचा केला जाणारा अतिवापर ही देशासमोर एक मोठी समस्या बनली होती. त्यादृष्टीकोनातून हा निर्णय घेतला गेला आहे. भारताची परिस्थिती पाहता भारतातील लहान मुलांकडून आज सोशल मीडियाचा आणि इंटरनेटचा बेसुमार वापर केला जात आहे ज्याचा परिणाम मुलांच्या आरोग्यावर होत आहे. हट्ट करणाऱ्या मुलाला शांत ठेवण्यासाठी किंवा त्याला वेळ घालवण्यासाठी पालक मंडळी आपले स्मार्ट फोन सर्रासपणे पाल्याच्या हाती देतात. काही महाभाग तर आपल्या मुलांना स्वतंत्र स्मार्टफोन्स उपलब्ध करून देतात. आज घरोघरी वायफाय आल्याने आणि इंटरनेट डाटाही स्वस्त झाल्याने या स्मार्टफोन्सवरील इंटरनेटचा मुले मुक्तपणे वापर करताना दिसतात. ऑनलाईन व्हिडीओ गेम्स खेळण्यात आणि रिल्स पाहण्यात ती तासनतास रमतात. रिल्सना वयाचे बंधन नसल्याने हिंस्त्र स्वरूपाचे, अश्लील कंटेंट आणि संवाद असलेले, शिव्यांचा मुक्त वापर केलेले रिल्स मुलांच्या पाहण्यात येतात. सातत्याने असे रिल्स पाहिल्याने त्याचे मुलांच्या कोवळ्या मनावर विपरीत परिणाम होतात. रिल्समध्ये ऐकलेल्या शिव्या मुलेही एकमेकांना देऊ लागतात. ज्यामुळे मुलांमध्ये भांडणे होऊन त्याचा पालकांच्या डोक्याला ताप होतो. लॉकडाऊनच्या काळात मुलांचे शिक्षण थांबायला नको म्हणून ऑनलाईन शिक्षणाचा पर्याय निवडण्यात आला होता ज्यामुळे प्रत्येक मुलाच्या हातात स्मार्टफोन आला. या प्रदीर्घ कालावधीत स्मार्टफोन वापरण्यात मुले पारंगत झाली; मात्र शिक्षणाव्यतिरिक्त मनोरंजनाचे प्रचंड मोठे दालन या हातात मावणाऱ्या स्मार्टफोनमध्ये सामावले असल्याचे मुलांना लहान वयातच ज्ञात झाल्याने मुले मनोरंजनाच्या आणि खेळाच्या अन्य साधनांपेक्षा स्मार्ट फोन्समध्ये अधिक रमु लागली आहेत. स्मार्ट फोन्सच्या अतिवापरामुळे मुलांमध्ये चिडचिड करणे, राग येणे, सूड भावनेने वागणे, तुलना करणे. मनोराज्यात रमणे यांसारखे दोष वाढले आहेत. इतरांच्या तुलनेत स्मार्ट फोन्स वापरणाऱ्या मुलांमध्ये अपमानाचे आणि आत्महत्येचे विचार अधिक प्रमाणात येत असल्याचेही एका सर्वेक्षणातून सिद्ध झाले, त्यामुळेच गेल्या काही वर्षांत लहान मुलांच्या आत्महत्येचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. अधिक प्रमाणात कार्टून्स बघून मुले त्यातील पात्रांप्रमाणेच वागू लागतात. मुलांच्या मानसिक आरोग्यावर स्मार्ट फोन्सचा विपरीत परिणाम होतो, त्यांची शारिरिक आणि बौद्धिक वाढही खुंटते. पौगंडावस्थेतील मुले स्मार्ट फोन्सवरील रिल्स आणि हिंसक दृश्ये पाहून व्यसनाच्या आहारी जाऊ लागल्याचेही निरीक्षणातून सिद्ध झाले आहे. गेल्या काही काळात सायबर गुन्हेगारीचे प्रमाण वाढले असून या सायबर गुन्हेगारीलाही मुले बळी पडू लागली आहेत. स्मार्ट फोन्सचा अति वापर मुलांमध्ये शिक्षणाविषयी, मैदानी खेळाविषयी रुची कमी करतो. मुलांच्या मेंदूचा विकासही स्मार्ट फोनच्या अतिवापरामुळे खुंटतो. मुली भावनाशील असल्याने स्मार्ट फोनचा अधिक वापर करणाऱ्या लहान मुलींच्या मानसिक आणि शारीरिक आरोग्यावर लवकर परिणाम होतो. जगभरातील हवी ती माहिती चुटकीसारखी उपलब्ध करून देणारा स्मार्ट फोन स्वतः स्मार्ट असला तरी त्याच्या अतिवापरामुळे लहान मुलांचे आरोग्य आणि भवितव्य धोक्यात आले आहे हे निश्चित. आधुनिक जीवनाचा अविभाज्य भाग असणाऱ्या स्मार्ट फोनपासून मुलांना पूर्णपणे दूर करूनही चालणार नाही; मात्र आजमितीला प्रत्येक पालकांनी आपल्या मुलांचा स्क्रीन टाइम निश्चित करणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे ऑस्ट्रेलियाने आपल्या देशात मुलांच्या स्मार्ट फोन वापरावर बंधने आणली, तशा प्रकारची बंधने भारतातही आणण्याची आज नितांत गरज आहे.

# करोडो रुपयाची बिले गुत्तेदाराने घशात घालत उमरी जल जीवन चे काम केलं ठप्प

## जालिंदर डावकर ला कारवाईची नोटीस मार्च पर्यंत काम पूर्ण करा नसता कारवाईस सामोरे जा

माजलगाव - तालुक्यातील उमरी येथे जलजीवन पाणी पुरवठा योजनेच्या कामाचा दोन वर्षांपूर्वी शुभारंभ करण्यात आला होता. त्यानंतर कामाला सुरुवात केली मात्र कामाचा दर्जा अतिशय निकृष्ट होता.निकृष्ट करत असलेले काम आज पर्यंत पूर्णत्वास न करता करोडो रुपयाचे बिले गुत्तेदारीने घशात घातली आहे त. याबाबत अनेक तक्रारी व काम ठप्प आसल्या संबंधी कंपनीने उमरी येथील गुत्तेदार जालिंदर डावकर यांना नोटीस बजावत मार्च पर्यंत काम करण्याचे आदेश दिले आहेत. नसता कारवाईस सामोरे जा अशी तंबी दिली आहे.

ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध व दररोज पाणी मिळावे म्हणून केंद्र सरकारने हर घर जल ही योजना जलशक्ती मंत्रालयाने २०१९ मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत केन्द्र शासनाने अत्यंत महत्वकांक्षी कार्यक्रम राबवला. जिल्ह्यातील अनेक गावासाठी करोडो रुपयांचा निधी आला होता.

यामध्ये माजलगाव तालुक्यातील उमरी येथील जलजीवन योजनेसाठी तब्बल ४ कोटी रुपयाचा निधी मिळाला होता. या कामाची सुरुवात एप्रिल २०२३ मध्ये झाली होती काम सुरू होऊन दोन वर्षे होत आहे तरीही संबंधित गुत्तेदाराला काम पूर्ण करता आले नाही निकृष्ट दर्जाचे अर्धवट काम करून १ कोटी ४३ लाख ७४ हजार २९४ रुपयाचा निधी घशात घातला आहे.

या कामाच्या अनेक तक्रारी ग्रामस्थांनी करूनही संबंधित गुत्तेदार अधिकारी ,पुढायांच्या आशीर्वादाने काम बोगस करण्याचा सपाटा लावला होता. संबंधित गुत्तेदाराने मागील आनेक महिन्यापासून अर्धवट काम सोडले आहे. आता उन्हाळ्याला सुरुवात झाली असून पाणी प्रश्न गंभीर होणार आहे. अर्धवट असलेल्या कामाच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. त्यामुळे वाप्कोस या कंपनीने केला जिल्ह्यात जलजीवनचे काम अर्धवट करणा-या गुत्तेदारांना नोटीस बजावल्या आहेत.

दोन वर्षे कामाला होऊन ही काम पूर्ण न झाल्याने उमरी येथील गुत्तेदार जालिंदर डावकर यांना नोटीस बजावली असून तुमच्या कामावर मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी नाराजी व्यक्त केली असल्याचेही नमूद केले आहे.

त्याचबरोबर संबंधित गुत्तेदाराची पंधरा दिवसाला जिल्हा परिषद मध्ये जलजीवन योजने संदर्भात बैठक घेण्याचे ही ठरवले

असुन कामाबाबत पंधरा दिवसाला आढावा घेतला जाणार आहे.यामुळे संबंधित गुत्तेदारावर काय कार्यवाही होते याकडे उमरीकरांचे लक्ष लागले आहे.

--------

कामासह जीएसटी बिलेही बोगस

उमरी जलजीवन चे काम अतिशय निकृष्ट करण्यात आले तर आहेच त्याच बरोबर या कामाला वापरण्यात आलेले साहित्याची बिले जोडली आहेत ती बिले देखील बोगस असल्याचा संशय आहे. निकृष्ट कामासह जीएसटी बिला संबंधी मोठा घोटाळा उघडकीस येण्याची शक्यता निर्माण झाली आहे . बोगस बिले घेऊन शासनाची फसवणूक करणा-या गुत्तेदाराची चौकशी करावी या मागणीसाठी आंदोलन करण्यात येईल

- वैजनाथ घायतिडक
- ( उमरी, ग्रामस्थ)

-------

कारवाईच्या नोटीसीने गुत्तेदारांमध्ये खळबळ

जिल्ह्यामध्ये सर्वाधिक जलजीवन योजनेचे कामे करणारा जालिंदर डावकर एकमेव आहे .सर्वात निकृष्ट दर्जाची कामे करून माझ्यामागे जिल्ह्यातील बडा पुढारी असल्याने माझे काहीच होत नाही अशा अविर्भावात असणा-या जालिंदर डावकर ला कारवाईची नोटीस आल्याने जलजीवन योजनेचे काम करणा-या सर्वच गुत्तेदारांमध्ये खळबळ माजली आहे.

-------

उमरीकरांना या उन्हाळ्यातही मिळणार नाही पाणी

जल जीवन योजनेचे काम गेल्या दोन वर्षापासून कासव गतीने चालू आहे. उन्हाळ्यामध्ये उमरीकरांना विकतचे पाणी घेण्याची वेळ आली होती. या उन्हाळ्यात तरी उमरीकरांना जल जीवन योजनेचं पाणी मिळेल अशी आशा असताना काम अर्धवट असल्याने या उन्हाळ्यात ही उमरीकरांना पाणी मिळणार नसल्याचे दिसून येत आहेत.

-------

प्रशासक असल्याने डावकरची मुजोरी वाढली

उमरी ग्रामपंचायत वर गेल्या दोन वर्षापासून प्रशासक असल्याने या ठिकाणी निकृष्ट दर्जाचे काम करण्याचा जालिंदर डावकर यांनी सपाटा लावला होता. या कामाच्या अनेक तक्रारी असतांनाही त्याला करोडो रुपयाचे बिले आदा करण्यात आली. ग्रामपंचायत वर प्रशासक असल्याने या कामाला कोणीच वाली नसल्याने जालिंदर डावकर याची मजोरी वाढल्याने त्यांनी जलजीवन योजनेचे काम मुदतीत पूर्ण केले नाही.

------

क्र.2025/संकीर्ण/जन्म-मृत्यु नोंदणी/कावि-
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार
सिंदखेड राजा
दि. 15/01/2025

जाहिरनामा

जन्म मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा 2023 मधील कलम 11 अन्वये

सर्व जनतेस तालुका सिंदखेड राजा यांना जाहिर केले जाते की, अर्जदार श्री. पंकज लिंबाजी जाधव रा. पिंपळगाव कुडा ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा यांनी नामे बाबुराव नरसिंगराव जाधव यांचा मृत्यू दि. 17/02/1990 रोजी राहत्या घरीपिंपळगाव कुडा ता. सिंदखेड राजा जि. बुलढाणा येथे मृत्यू झाला असून अर्जदारांनी स्वतः सदरहू कायदेशीर मृत्यू नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदाराच्या कायदेशीर मृत्यू दिनांक 17/02/1990 रोजी कायदेशीर नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासून 15 दिवसाच्या आत त्याने ह्या कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार ह्यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदार नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

सही
कार्यकारी दंडाधिकारी तथा
तहसीलदार सिंदखेड राजा

## कामाई देवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने पत्रकाराचा सन्मान



लोकनेता न्युज नेटवर्क
नायगाव,माधव बैलकवाड

तालुक्यातील मौजे शेळगाव छत्री येथील काँग्रेस पक्षाच्या जिल्हा सरचिटणीस तथा सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती रेखाताई बनसोडे यांनी गेल्या अनेक वर्षापासून तळागाळातील लोकांसाठी भरीव काम केल्याने त्यांच्या सामाजिक कार्याची विविध वृत्तपत्रात बातम्या प्रकाशित झाले आहेत,पत्रकार बांधवच आपणास मोठे केले ही उदात भावना मनाशी ठेवून त्यांच्या कामाई देवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने राजमाता जिजाऊ व ज्ञानमाता सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून अनेक पत्रकाराचा त्यांनी सन्मान चिन्ह शाल पुष्पहार देऊन सन्मान केलेला आहे. नायगाव शहरातील माधव पाटील चव्हाण यांच्या फायनान्स कार्यालयामध्ये आयोजित केलेल्या पत्रकाराचा सन्मान व हळदी कुंकू कार्यक्रमात अध्यक्षस्थानी कामाई देवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती रेखाताई बनसोडे यासह सुनिता गंगाधरराव कोकणे,जनता हायस्कूल प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक गंगाधर चव्हाण ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते भगवानराव अंचोंलीकर सामाजिक कार्यकर्त्या महानंदा गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती,प्रारंभी राजमाता जिजाऊ, ज्ञानमाता सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले व उपस्थित पत्रकारांचा सन्मान चिन्ह शाल पुष्पहारने सन्मान करण्यात आला तर मुख्याध्यापक गंगाधर चव्हाण यांच्या वतीने ही पत्रकाराचा डायरी पेन व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला आहे उपस्थित मान्यवरांनी आपले यावेळी विचार मांडले सदर संस्थेच्या वतीने महिलांचा मकर संक्रातीच्या सणामुळे हळदीकुंकू लावून वान देण्यात आले. यावेळी अशोक कुंभार, वसंत पांचाळ, शोभाबाई पवार, ललिताबाई पवार, मीराबाई पवार,अर्चना पवार,मुद्रकबाई पवार, शकुंतलाबाई पवार, लक्ष्मीबाई कांबळे, पिराबाई भेदेकर, चौत्राबाई भालेराव, विमल भालेराव, लक्ष्मीबाई कुंभार, भागनबाई कुंभार, दीक्षा गायकवाड यासह अनेक महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती तर सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार पत्रकार माधव बैलकवाड यांनी मानले.

## सोमनाथ सूर्यवंशी न्यायासाठी आंबेडकरी चळवळीतील निळा जनसागरचा परभणी ते मुंबई लाँग मार्च

दैनिक लोकनेता नेटवर्क
मुंबई! संदीप खरात

परभणी ते मुंबई असे ५५० किलोमीटर अंतर पार करून भीम अनुयायी न्यायाच्या प्रतीक्षेत मुंबई कडे रवाना झाले आहेत संविधान प्रतिकृतीचा अवमान झाल्यानंतर उसळलेल्या दंगलीत अटकेत असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मृत्यूप्रकरणी निषेध म्हणून आज परभणी ते मंत्रालय असा लाँग मार्च काढला जात आहे. आंबेडकरी चळवळीने या मृत्यूसाठी संबंधित प्रशासनाला जबाबदार धरले आहें व कारवाईची मागणी केली आहे.

संविधान प्रतिकृतीचा अवमान झाल्यानंतर उसळलेल्या दंगलीत अनेकांना अटक करण्यात आली होती. या प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेल्या सोमनाथ सूर्यवंशी यांचा मृत्यू झाल्याने तणाव वाढला. आंबेडकरी अनुयायांनी संबंधितावर मारहाण केल्याचा आरोप लावला आहे.तसेच आंदोलनाप्रकारणी ज्येष्ठ नेते विजय वाकोडे यांचाही हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला होता. त्यांच्या कुटुंबीयांनी हा मृत्यू घटनांमुळे झालेल्या तणावातून झाला असल्याचा दावा केला आहे.सबंधितावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा.संविधान अवमान प्रकरणातील मास्टरमाईडला शोधून काढावे.सोमनाथ सूर्यवंशी आणि विजय वाकोडे यांच्या कुटुंबीयांना शासकीय नोकरी व आर्थिक मदत द्यावी या प्रमुख मागण्यांसाठी हा लाँग मार्च निघाला आहे.जो शुक्रवार पर्यंत मुंबईत दाखल होणार आहें महिना उलटूनही मागण्यांवर कोणतीही कारवाई न झाल्याने आंदोलनकर्त्यांनी परभणी ते मंत्रालय लाँग मार्चचे (झरीलहरपळ डेपस चरीलह) आयोजन केले आहे. हजारो आंबेडकरी अनुयायी या आंदोलनात सहभागी झाले आहेत. परभणीपासून मंत्रालयापर्यंतचा लाँग मार्च सरकारला जाग आणण्यासाठी महत्त्वाचा ठरतो आहे. सद्यस्थितीत प्रशासनाकडून कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. मात्र, या आंदोलनामुळे सरकारवर दबाव वाढला आहे. सरकारने तातडीने यावर तोडगा काढला नाही, तर आंदोलन आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे.,,,!!




## कलंबर खुर्द येथे आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा सत्कार संपन्न



लोकनेता न्युज नेटवर्क आष्टी
उस्माननगर प्रतिनिधी

कंधार लोहा विधानसभेचे लोकप्रिय आमदार माननीय प्रतापराव पाटील चिखलीकर साहेब यांचा आमदार म्हणून निवडून आल्याबद्दल आमदार झाल्याबद्दल कलंबर येथील घोरबांड परिवारातर्फे गजानन पाटील ,बालाजी पाटील ,गंगाधर पाटील यांच्या तर्फे सत्कार करण्यात आला यावेळी विठ्ठल घोरबांड ,संभाजी घोरबांड ,सत्तार शेख ,बळीराम कोठेवाड ,दिलीप पाटील घोरबांड, माधव घोरबांड ,बाबू घोरबांड ,माधवराव बोईनवाड बाबाराव कोठेवाड ,सोपान पेंडलवाड गोविंदराव पाटील घोरबांड ,उत्तम पाटील घोरबांड ,व्यंकटी पाटील घोरबांड, प्रकाश पाटील घोरबांड हे यावेळी उपस्थित होते.



## प्रशासनाच्या आश्वासनानंतर अखेर आंदोलन मागे

### ११ फेब्रुवारी पर्यंत अतिक्रमण हटवण्याची दिले लेखी आश्वासन

लोकनेता न्युज नेटवर्क आष्टी
सेनगाव (महादेव हरण):-

११ फेब्रुवारी पर्यंत आश्वासनाची पूर्तता न झाल्यास १२ फेब्रुवारी पासून ग्रामस्थ दिला जिल्हाधिकारी कार्यालय समोर आत्मदहनाचा इशारा पानकनेरगांव : येथील गेल्या तिन वर्षापासून शासकीय गायरान मधील अतिक्रमण हटवण्यासाठी ग्रामस्थांच्या वतीने संविधानीक मार्गाने अनेक उपोषण, मोर्चे,रास्ता रोको आंदोलन करण्यात आले सदर मात्र यावर प्रशासनाकडून अजूननही कुठलीच कठोर कारवाई करण्यात आली नाही संबंधित प्रशासनाचे अधिकारी जाणून बुजून टाळाटाळ करत असून अतिक्रमणधारकासोबत मिळता जुळता व्यवहार करत आहे संबंधित अधिकारी यांच्या मनमानी कारभारामुळे गावकरी आता त्रस्त झाले आहेत आंदोलन असले की संबंधित अधिकारी आंदोलन स्थळी येऊन लेखी आश्वासन देत आंदोलन तात्पुरते स्थगित करत आहेत सदर मात्र आश्वासनाची पूर्तता न करता निव्वळ ग्रामस्थांना चॉकलेट देऊन फसवणूक करत आहेत त्यात अनुषंगाने ग्रामस्थांनी पुन्हा एकदा २ जानेवारी रोजी अतिक्रमण हटवण्यासाठी मा तहसीलदार साहेब यांना निवेदन दिलं होतं सदर अतिक्रमण न हटवल्यास २० जानेवारी रोजी पान कनेरगाव फाट्यावर आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला सदर मात्र प्रशासनाने कुठलीच कारवाई न केल्यामुळे आज २० जानेवारी रोजी पान कनेरगाव फाट्यावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते आंदोलनाची दखल घेत सेनगाव नायब तहसीलदार कारघूडे साहेब, मंडळ अधिकारी शिवानंद झोडगे, पान कनेरगाव सज्जाचे तलाठी हर्षवर्धन गवई, ग्रामविकास अधिकारी संतोष मेनकूदळे,आंदोलन स्थळी दाखल झाले अखेर प्रशासनाच्या आश्वासनानंतर आजचे आंदोलन मागे घेण्यात आले सदर अतिक्रमण ३३० मधील पाच एक्कर पाव बंद करून सदर इतर अतिक्रमण हटवण्यात येईल असे लेखी आश्वासन दिले प्रशासनाकडून ११ फेब्रुवारीपर्यंत आश्वासनाची पूर्तता न झाल्यास १२ फेब्रुवारी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ग्रामस्थांच्या वतीने आत्मदहनाचा इशारा देण्यात आला व तसेच आंदोलन स्थळी सेनगाव पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक बालाजी घारगे,बिड जमादार राजेश जाधव,शिवदर्शन खांडेकर, एकनाथ राठोड,अंमलदार, इतर पोलीस कर्मचारी व पोलीस पाटील मूकूल हांडेकर,चोख बंदोबस्त पहायला मिळाला

# शिक्षक रवींद्र लोखंडे यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर



लोकनेता न्यूज नेटवर्क

पारध /रमेश जाधव

भोकरदन तालुक्यातील पारध येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे जेष्ठ शिक्षक तथा पत्रकार रवींद्र लोखंडे यांना पुणे येथील इतिहास अकादमी, राष्ट्रसेवा समूह, रयत प्रकाशन व गिरीप्रेमी ग्रुप यांच्यावतीने आपल्या देशात सार्वजनिक आणि मोफत शिक्षणाचा पाया घालणा-या म हात्मा फुले आणि सावित्रीबाई फ ुले यांच्या प्रति असणा-या कृत्याज्ञ भावनेने त्यांच्या नावे राज्यस्तरीय महात्मा फुले व सावित्रीबाई फुले गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर झाला असून सदरील पुरस्कार युवराज छत्रपती संभाजी महाराज यांच्या हस्ते तथा माजी आ. दत्तात्रय सावंत, पुणे विभागाचे शिक्षण निरीक्षक रावसाहेब मिरगणे, आय. आर. एस. विपुल वाघमारे, प्रसिद्ध शिवचरित्रकार डॉ. श्रीमंत कोकाटे, श्रीराम शिक्षण संस्थेच्या श्रीलेखा पाटील, शिक्षकेतर संघटनेचे सचिव शिवाजी खांडेकर, जयहिंद साखर कारखान्याचे चेअरमन गणेश माने देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत २३ जानेवारी २०२५ रोजी पुणे येथील एस एम जोशी सभागृहात प्रदान करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी एका पत्राद्वारे कळविले आहे. लोखंडे यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल माजी केंद्रीयमंत्री रावसाहेब दानवे, आ.संतोष दानवे, माजी सभापती परमेश्वर लोखंडे, शिवसेनेचे जिल्हा उपप्रमुख (उद्धव ठाकरे गट) मनीष श्रीवास्तव,संस्थेचे सचिव उदयसिंह लोखंडे, उपाध्यक्ष सुनील वानखेडे,प्राचार्या शर्मिला शिंदे लोखंडे, पर्यवेक्षक,महेंद्र लोखंडे, प्रा.संग्रामराजे देशमुख ,पत्रकार बांधव यांच्यासह शिक्षक, प्राध्यापक,शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

# उमरीत पतंजलीचे स्वामी यज्ञदेव महाराजांचे भव्य योग व यज्ञ प्रशिक्षण शिबीर संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

उमरी महेश पडोळे

उमरी : शहरातील मोंढा मैदानावर ७ दिवसीय भव्य दिव्य योग विज्ञान,यज्ञ एवंम ध्यान शिबीर संपन्न झाले. ज्यात हरिद्वारचे संन्यासी पु. स्वामी यज्ञदेवजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ५१ कुंडी महायज्ञ व प्रशिक्षण देण्यात आले. १३ जानेवारी ते १९ जानेवारी २०२५ दरम्यान पहाटे ५ते ७ पर्यंत मोंढा मैदानावर निःशुल्क भव्य दिव्य योग विज्ञान एवंम ध्यान शिबीर संपन्न झाले. प्रशिक्षणा दरम्यान पतंजली योग समिती जिल्हाध्यक्ष जिल्हाध्यक्ष सुरेश लंगडापुरे , पुसद तालुका प्रभारी प्रकाश वानरे, व सौ. माधुरीताई




वानरे , कंधार तालुका प्रभारी निळकंठ मोरे यांनी योग प्रशिक्षण दिले. शिबिराचे मुख्य आयोजन भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव डॉ.अम ोल पा.ढगे यांनी केले होते. ह्या शिबिरा दरम्यान दररोज ८ प्रकारचे प्राणायाम, ४२ प्रकारची बैठे,खडे,हाथ-पायाचे आणि पाठ व पोटावरचे सर्व कठीण- सामान्य आसने,सूर्यनमस्कार , योगीक जॉगिंग ,१२ प्रकारचे तरुणांसाठी दंड आसने-बैठक,ध्यानधारणा याचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले. सर्व योग साधकांना दररोज विविध प्रकारचे ज्यूस मोफत देण्यात आले. यासाठी गोविंद अट्टल, शंकरराव माली पाटील, गंगाधर पाटील पुयड, आदेश जैन, गणेश मदने,गजानन करखेलीकर आदींचे योगदान लाभले. योग शिबिराच्या समारोपप्रसंगी पतंजली योगपीठ हरिद्वार चे संन्यासी संन्यासी पूजन स्वामी यज्ञदेवजी महाराज यांच्यामध्ये प्रशिक्षण प्रशिक्षण यशस्वीरित्या पार पडले. यावेळी १०० योग साधक महिला पुरुषांनी पांढरे वस्त्र परिधान करून यज्ञ प्रशिक्षण घेतले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी बालाजीराव येरावार, गंगाधर पाटील पुयड, गोविंदसेठ अट्टल,डॉ.अविनाश पा.ढगे,केदार चिटमलवार,गणेश चव्हाण,प्रल्हाद पाटील जोगदंड,पंडितराव बेंबरे,चव्हाण बुध्दाजी,गजानन करखेलीकर,गणेश देवराये गुरुजी,करखेलीकर गजानन, अक्कलवाड गणेश,गणेश मदने, कमलाकांत उत्तरवार, माधव जंगेवाड, गंगाधर कस्तुरे,विद्याताई अग्रवाल, करुणा खंडेलोटे, सुरेखा गोकावार ,कविता हामंद, विजयमाला ताटीकुंडलवार,गोदावरी धानोरकर,रेणुका भुजबळे,विजया राउलवार,शकुंतला चव्हाण आदिसह परिश्रम घेतले.

# व्हिपीके पतसंस्थेच्या कर्मचाऱ्यांसाठी थकीत कर्जाची कायदेशीर वसुली यावर मार्गदर्शन

लोकनेता न्युज नेटवर्क

नांदेड बाजीराव गायकवाड

व्हिपिके पतसंस्थेचे अधिकारी आणि कर्मचा-यांसाठी थकीत कर्जाची कायदेशीर मार्गाने कशी वसुली करावी यासाठी पुणे येथील श्री आर. बी. यादव साहेब मार्गदर्शन करण्यासाठी कुसूमनगर, वाघलवाडा येथील एमव्हिके कारखान्याच्या सभागृहात आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी मा. मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी पतसंस्थेच्या कर्मचा-यांना मार्गदर्शन केले. पतसंस्था आपल्या व्यवसायाचा ४५० कोटीचा पल्ला गाठला असून, पतसंस्थेचा नेट एनपीए फक्त १.५९ टक्के असल्याचे सांगितले. यापुढे असेच कर्मचा-यांना तज्ञ लोकांचे मार्गदर्शन मिळावे म्हणून प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याची सुचना केली. तसेच उमरी, धर्माबाद, नायगाव, बिलोली, भोकर या तालुक्यातील शेतक-यांचा उस वेळेवर गाळपासाठी जाऊन शेतकरी उस पिकाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या संपन्न व्हावा या उद्देशाने वाघलवाडा येथे नवीन पाच हजार टन क्षमतेचा उस कारखाना व इथेनॉल प्रकल्प लवकरच उभा करण्यासाठी या भागातील शेतक-यांचे विचार घेण्यासाठी दि. २१ जानेवारी २०२५ पासून दौरा करणार असल्याचे सांगितले आहे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमास सहकार भारतीचे पदाधिकारी व भाग्यलक्ष्मी सहकारी बँकेचे संचालक, व्हिपिके, एमव्हिके व डॉ. शंकरराव चव्हाण कारखान्याचे अधिकारी व कर्मचारी, पतसंस्थेचे सचिव श्री नागनाथराव पांचाळ, आर्थिक सल्लागार श्री उदयकुमार कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री ए. बी. शिंदे, सरव्यवस्थापक



श्री नामदेवराव इंगोले, तपासणी विभाग प्रमुख श्री ए. जे खेडकर, वसुली विभाग प्रमुख श्री बि. एन. गाढे, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# पत्रकार नवनाथ आडे यांची सायं.दै महाराष्ट्र आरंभ या दैनिकाची उपसंपादक पदी निवड!

## पत्रकारिता हाच माझा श्वास सर्वसामान्यांच्या न्यायासाठी सतत सत्य लिहिणार - नवनाथ आडे



लोकनेता न्युज नेटवर्क अकोला

गेवराई प्रतिनिधी

गेवराई : तालुक्यातील ग्रामीण भागातील असलेले पत्रकार नवनाथ नवनाथ आडे यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील कार्याला पाहता त्यांची तालुका प्रतिनिधी वरून सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ या दैनिकाच्या उपसंपादक पदी निवड करण्यात आली आहे. आजच्या पत्रकारिता क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात डिजिटल मिडिया तसेच साप्ताहिक, दैनिक वर्तमानपत्राद्वारे अनेक पत्रकार कार्य करत आहेत. पत्रकार क्षेत्रातील नव्याने नावलौकिक मिळवलेले गेवराई तालुक्यातील कोमलवाडी या ग्रामीण गावातील पत्रकार नवनाथ आडे यांनी आपल्या परखड आणि निर्भीड लेखणीच्या माध्यमातून सर्व साम ान्यांना न्याय मिळवून देण्याचे काम केले आहे. तसेच अगदी सामाजिक, शैक्षणिक व पत्रकारिता क्षेत्रामध्ये आपला ठसा उमटवला असून, मोठा दबदबा निर्माण केला आहे. स्वतः दिव्यांग असून पत्रकारिता क्षेत्रामध्ये निर्भीडपणे काम करत पत्रकारितेच्या माध्यमातून समाजकार्य करत आहे. यामुळे त्यांचे सर्वत्र स्तरावर कौतुक करून शुभेच्छा देत आहेत. पत्रकारिता क्षेत्रामध्ये पत्रकार नवनाथ आडे यांनी नावलौकिक मिळवल्याने, त्यांच्या या निर्भीड कार्याला पाहता सायं.दैनिक म हाराष्ट्र आरंभ या दैनिकाच्या उपसंपादक पदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. पत्रकार नवनाथ आडे यांनी निर्भीड आणि निस्वार्थ भावनेने पत्रकारिता क्षेत्रामध्ये काम करत आहेत. अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार विरोधात परखड लेखणीच्या माध्यम ातून शासनदरबारी आवाज उठवत तसेच समाजातील खरे वास्तव मांडून निर्भीड पत्रकारितेतून लोकशाहीचा चौथा स्तंभ बळकट करण्याचे काम करत आहेत. गोरगरीब सर्व साम ान्यांच्या हितासाठी परखड आणि निर्भीड लेखणीतून आवाज उठवत आपल्या सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ या दैनिकातून समाज प्रबोधनाचे काम केले. त्यांनी सामाजिक परिस्थिती जाणून समाज्यातील अन्यायाविरोधात वाचा फोडण्याचे काम केले. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून आपल्या लेखणीतून समाज प्रबोधन होत आहे. पत्रकार नवनाथ आडे यांच्या पत्रकारिता क्षेत्रातील कार्याला पाहता त्यांची तालुका प्रतिनिधी वरून उपसंपादक पदी निवड करून मोठी जबाबदारी देण्यात आली आहे. पत्रकारितेच्या माध्यमातून सम ाजातील सर्व घटकांना न्याय देण्याची त्यांची भूमिका तत्पर आहे. कणखर आणि निर्भीड पत्रकारिता हे त्यांचे वैशिष्ट्य असून, ते अधिकाधिक अजून धारधार व्हावे, अशा शुभेच्छा मिळत आहे. अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार विरोधात पत्रकारितेच्या माध्यमातून निर्भीडपणे आवाज उठवणार आणि सतत सत्य लिहिणार असल्याचे पत्रकार नवनाथ आडे यांनी सांगितले. त्यांच्या या निवडीने सर्व स्तरावरून त्यांना शुभेच्छा मिळत असून सगळ्यांचे आभार मानले आहे.

# व्हि.पी.के उद्योग समूह गाळप हंगाम २०२४-२५ मध्ये देणार उसाला उच्चांकी भाव

लोकनेता न्युज नेटवर्क

नांदेड` बाजीराव गायकवाड

व्हि.पी.के उद्योग समूहातील व्हि.पी. के. अँग्रो प्रयागनगर सिंधी व डॉ. शंकरराव चव्हाण जागरी । अँग्रो प्रोडक्ट कुसुमनगर वाघलवाडा आणि एम व्ही के अँग्रो प्रा.ली कुसूमनगर वाघलवाडा ता उमरी या तिन्ही कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील शेतक-यांनासाठी आनंदाची व आर्थिक दृष्ट्या सुबकता देणारी भाववाढ योजना उद्योग समुहाचे चेअरमन मा.मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी जाहीर केली आहे. व्हि.पी.के उद्योग समूहातील दोन गूळ पावडर कारखाने ऑक्टोंबर महिन्याच्या सुरुवातीस प्रत्यक्ष गाळपास सुरू झाले असून एम.व्ही. के. अँग्रो प्रा.ली कुसुमनगर वाघलवाडा हा कारखाना नोव्हेंबर महिन्यात चालू झाला आहे उद्योग समुहाचे चेअरमन



मा.मारोतराव पाटील कवळे गुरुजी यांनी जाहीर केले की आपल्या कारखान्यास ज्या शेतक-याने.१ जानेवारी ते १५ जानेवारी २०२५ पर्यंत ऊस गाळपासाठी पाठवला त्या शेतक-यास प्रती टन २३६०/- रूपये पहिला हफ्ता देणार व जे शेतकरी १६ जानेवारी ते ३१ जानेवारी २०२५ मध्ये ऊस घालवतील त्यांना प्रती टन २४१० -रू आणि ०१ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी २४६०/- रू व १६ फेब्रुवारी ते २९ फ ेब्रुवारी २५१०/- रू* आणि ०१ मार्च ते १५ मार्च २५६०/- रू व १६मार्च ते ३१ मार्च २०२५साठी २६१०/- रूपये प्रती टन पहिला हफ्ता देण्याचे जाहीर केले आहे. ऊस उत्पादकांनी लक्षात घ्यावे वरील रक्कम ही पहिल्या हफ्त्याची आहे आणि उर्वरित फायनल बिल दीपावली सणाच्या वेळी एफ आर पी प्रमाणे मिळणार आहे.

(०१ जानेवारी पासून दर १५ दिवसांनी ५०/- रू प्रती टन प्रोत्साहनपर भाव वाढ आहे)आपल्या भागातील ऊस उत्पादकांसाठी हा सुवर्ण काळ आहे त्यामुळे आपल्या भागातील शेतक-यांनी ऊस तोडणीसाठी घाई न करता व इतर कोणत्याही कारखान्यांच्या भूलथापांना बळी न पडता आपला ऊस राखून ठेवावा आणि आपल्या कारखान्यास ऊस गाळपास घालून भाव वाढ योजनेचा लाभ घेऊन आपली आर्थिक प्रगती साधावी असे आवाहन कारखाना व्यवस्थापनाने केले आहे.

# मेडिकल असोसिएशन कडून रक्तदान शिबिराचे आयोजन.

लोकनेता न्यूज नेटवर्क माहूर:प्रतिनिधी

माहूर तालुका मेडिकल असोसिएशन केमिस्ट ड्रगिस्ट संघटने कडून दि २४ रोजी सकाळी आठ ते सायंकाळी सहा वाजेपर्यंत अखिल भारतीय मेडिकल असोसिएशन संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष जगन्नाथ (आप्पासाहेब )शिंदे यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण भारत देशात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले असून माहूर मेडिकल असोसिएशन केमिस्ट अँड ड्रगिस्ट संघटनेचे तालुका अध्यक्ष समर भाऊ त्रिपाठी यांचे कडून हॉटेल कृष्णा पॅलेस येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती माजी नगराध्यक्ष समर भाऊ त्रिपाठी यांनी दिली आहे माहूर तालुक्यातील श्रीक्षेत्र माहूर मौजे वानोळा,वाई बाजार,कुपटी, आष्टा.येथे मेडिकल केमिस्ट अँड ड्रगिष्ट मेडिकलची एकूण ५५ दुकाने असून या संघटनेकडून दरवर्षी रक्तदान शिबिराचे मोठ्या प्रमाणात आयोजन करण्यात येते मेडिकल संघटनेच्या पदाधिकारी सदस्यासह शहरातील नागरीकही मोठ्या प्रम ाणात या रक्तदान शिबिरात रक्तदान करतात या शिबिरात मेडिकल असोसिएशन सह वैद्यकीय संघटना कडून मोठ्या प्रमाणात रक्तदान होणार असल्याने या शिबिरात रक्तदान करण्याचे आवाहन माहूर तालुका केमिस्टं अँड ड्रगिस्ट मेडिकल असोसिएशनचे अध्यक्ष समर भाऊ त्रिपाठी, राजू जहागीरदार, सचिन बेहेरे,रितेश देशपांडे ,फैसल बावाणी, सुनील कलाने ,जावेद खीची, सुनिल गोविंदवार ,शेख परवेज शेख, दिनेश तगलपल्लेवार, प्रतीक चुंगडे ,तौसिफ बावाणी,घनश्याम केशवे,इसाद कुरेशी, विनोद ठाकरे,राम नरवाडे, रफिक सौदागर यांचे सह मेडिकल संघटने कडून करण्यात आले आहे.


# लोकशाही पत्रकार संघटना सदैव पत्रकारांचा विचार घेऊन कार्य करणारी एकमेव संघटना : भागवत वैद्य

## लोकशाही पत्रकार संघाची गंगापूर नवनिर्वाचित तालुका कार्यकारिणीचा सत्कार सोहळा संपन्न

लोकनेता न्युज नेटवर्क

आष्टी(अण्णासाहेब साबळे)

लोकशाही पत्रकार संघ,महाराष्ट्र राज्यचे समाजभिमुख कार्य पाहून अनेक नामावंत पत्रकार विश्वास ठेवून यासंघात सामील होत आहेत.२०२५ या वर्षाची पदाधिका-यांची फ ेर निवड त्याचबरोबर जे पदाधिकारी चांगले काम कार्य करत आहेत.लोकशाही पत्रकार संघ वाढीसाठी जोमाने काम करत आहेत अशा पदाधिका-यांची मोठ्या पदावर बढती करण्यात येत आहे.लोकशाही पत्रकार संघाचे पदाधिकारी संघ वाढीसाठी,समाज कार्य तत्परतेने करतात. लोकशाही पत्रकार संघटनेने सदैव पत्रकारांचा विचार घेऊन कार्य करणारी एकमेव संघटना अशी ओळख निर्माण केली आहे.असे प्रतिपादन संस्थापक अध्यक्ष भागवत वैद्य यांनी गंगापूर



तालुक्याच्या नूतन कार्यकारणी सत्कार प्रसंगी केले. याप्रसंगी व्यासपीठावर,मा.नगराध्यक्ष मोहसिन चाऊस,महिला प्रदेश अध्यक्ष निलोफर शेख,मराठवाडा सचिव वसीम आजाद,म राठवाडा सचिव अनिस कुरेशी,नाशिक जिल्हा अध्यक्ष महिला आघाडी जयश्री बसते,संभाजीनगर जिल्हा अध्यक्ष पोलीस मित्र विकास समिती राणीताई झिंजुर्डे यांची उपस्थिती होती. याप्रसंगी नूतन कार्यकारणीचा सत्कार करून नियुक्तीपत्र वाटप करण्यात आले.यावेळी जिल्हा उपाध्यक्ष प्रतापराव साळुंके,तालुकाध्यक्ष अम ीन पटेल,उपाध्यक्ष ज्ञानेश्वर अमृते,सचिव गोकुळ लांडे,अन्वर बागवान,खलील पटेल, रामेश्वरअमृते,धनंजय ठोंबरे,गुलाब वाघ,अमोल शिंदे, सोमनाथ शिंदे,राजू जाधव,नारायण पठाडे,शिवराज केदारे,सुभान शहा,श्री तांबोळी,श्री बाराहाते,कलीम शेख सह इत्यादींची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रतापराव साळुंके यांनी केले तर आभार प्रदर्शन गंगापूर तालुका अध्यक्ष अमीन पटेल यांनी मानले.

# निवडणूक निर्णय अधिकारी नामतालिका तयार करणेबाबत

बीड, दि, २०:- ई वर्गातील संस्था म्हणजेच २५० पर्यंत किंवा त्यापेक्षा कमी सभासद असणा-या सहकारी गृहनिर्माण संस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी दिनांक २० जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांची नामतालिका पॅनल तयार करण्यासाठी विहित नमुन्यातील अर्ज १ शासकीय विभागातील (सहकार विभागातील कार्यरत अधिकारी,कर्मचारी वगळून) स्थानिक स्वराज्य संस्थेतील, सहकारी संस्थेतील कार्य कायम कार्यरत अधिकारी, कर्मचारी (वरिष्ठ लिपिक किंवा त्यापेक्षा जादा दर्जा असलेल्या



कर्मचारी ) प्रामाणित लेखापरीक्षक, वकील ( पाच वर्षाचा कामाचा अनुभव) शासकीय सेवेतून,स्थानिक स्वराज्य संस्थेतून सेवानिवृत्त झालेला अधिकारी, कर्मचारी (वयाचे ६५ वर्षे पेक्षा जास्त नसलेल्या) यांच्याकडून अर्ज मागविण्यात आले आहे.

विहित नमुन्यातील अर्ज दिनांक २० जानेवारी २०२५ ते ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत शासकीय सुट्टीचे दिवस वगळून खालील कार्यालयात कार्यालयीन वेळेत मि ळू शकतील तसेच या संदर्भातील विहित नमुन्यातील अर्ज जाहीर नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केले आहेत. अर्जदारांनी विहित नमुन्यातील अर्ज ३१ जानेवारी २०२५ अखेर खालील कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करण्याची दक्षता घ्यावी. याबाबतची जाहीर सूचना विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व संबंधित जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.कार्यालयाचे नाव जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था लातूर, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत तळमजला लातूर, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सहकारी शक्ती इमारत, जालना रोड बीड, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, सहकार भवन भूविकास बँक इमारत दुसरा मजला, आयटीआय समोर नांदेड, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत पहिला मजला धाराशिव या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर नोटीस लावण्यात आलेली आहे, असे विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त 27 जानेवारीला ग्रंथप्रदर्शनी




लोकनेता न्युज नेटवर्क

बुलडाणा, (ज्ञानेश्वर बुधवत)

: मराठी भाषेचा प्रचार व प्रसार व्हावा तसेच मराठी भाषेचे संवर्धन व्हावे याकरीता मराठी भाषा विभागाच्या धोरणानुसार दरवर्षी दि. 14 ते 28 जानेवारी या कालावधीत मराठी भाषा संवर्धन पंधरवडा साजरा करण्यात येतो. पंधरवडानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे दि. 27 जानेवारी 2025 रोजी सकाळी 11 वाजता ग्रंथप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रंथप्रदर्शनीसोबतच स्थानिक पुस्तक विक्रेते, प्रकाशक यांचेकडून बुक स्टॉल लावण्यात येणार असून त्यामुळे वाचकांना आपल्या आवडत्या ग्रंथांची खरेदी करता येणार आहे. या ग्रंथ प्रदर्शनीला जिल्ह्यातील सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी, शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच ग्रंथप्रेमी व वाचकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा ग्रंथालय अधिकारी सुनिल पाटील यांनी केले आहे.

## अन्नधान्यासह संसार उपयोगी साहित्य जळल्याने संसार उघड्यावर



दै . लोकनेता न्युज नेटवर्क
भोकर रमाकांत जोशी

भोकर ...शहरातील शास्त्रीनगर स्थित एका घराला शॉर्टसर्किटने आग लागून घरातील सर्व संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले आहे दि २० जानेवारी रोजी शहरातील शास्त्रीनगर उपस्थित सौ कलावती माधव राठोड ह्या आपल्या घराला कुलूप लावून कामाला गेले असता त्यांच्या घराला शॉर्ट सर्किटने आग लागली घराशेजारीच राहत असलेल्या त्यांच्या मुलाने आरडाओरडा सुरू केला असता शेजारच्या युवकांनी आग लागलेल्या ठिकाणी धाव घेऊन ताबडतोब आज विझण्याचा प्रयत्न सुरू केला अग्निशामक दलाच्या बंब ने वेळेवर येऊन आग आटोक्यात आणली परंतू घरातील टीव्ही फ्रिज कपडे अन्नधान्य सहित संसार उपयोगी साहित्य जळून खाक झाले कोणतीही जिवीत हाणी झाली नसली तरिही ते कुटुंब उघड्यावर आले आहे घटनेच्या ठिकाणी येऊन पो.हे.कॉ दिपक कंधारे,पो कॉ परमेश्वर कळणे पाहणी करूण पंचनामा केला

# ही विजयश्री अविस्मरणीय, महाराष्ट्राला आपला गर्व - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### खो खो च्या पहिल्या विश्वचषकावर भारताचे नाव कोरणाऱ्या महिला, पुरूष संघांचे अभिनंदन

मुंबई, दि. २० :- म..ही विजयश्री अविस्मरणीय आहे. या कामगिरीसाठी महाराष्ट्राला आपला गर्व आहे,फ अशा शब्दांत खो खो च्या पहिल्या विश्वचषकावर भारताचे नाव कोरून ऐतिहासिक कामगिरी करणा-या भारतीय महिला आणि पुरूष संघांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले आहे. या दोन्ही संघांचे कर्णधार पद महाराष्ट्राकडे असताना हा अविस्मरणीय विजय साकारले गेल्याचा विशेष आनंद व्यक्त करून मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी महिला संघाची कर्णधार प्रियंका इंगळे, पुरूष संघाचा कर्णधार प्रतिक वाईकर यांनी महाराष्ट्राची मान गौरवाने उंचावण्याची अद्वितीय कामगिरी केल्याचे गौरवोद्गार काढले आहेत.

ङ्गपहिल्याच विश्वचषकावर भारताचे नाव कोरण्याची कामगिरी आपल्या महाराष्ट्र सुपुत्रांनी

**कर्णधार प्रियंका इंगळे, प्रतिक वाईकर यांचे विशेष कौतुक**



केली आहे. या ऐतिहासिक कामगिरीसाठी विश्वविजेत्या महिला संघाची कर्णधार प्रियांका इंगळे हिच्यासह संघातील खेळाडे अश्विनी शिंदे, रेश्मा राठोड, वैष्णवी पवार तसेच पुरुष संघाचा कर्णधार प्रतिक वाईकर याच्यासह सुयश गरगटे, अनिकेत पोटे, आदित्य गनपुले व रामजी कश्यप या खेळाडूंचे कौतुक करावे तेवढेच थोडे आहे.

या विजयात पुरुष संघाचे प्रशिक्षक शिरीन गोडबोले, महिला संघाच्या प्रशिक्षक प्राचीताई वाईकर आणि फिजिओथेरेपिस्ट डॉ. अमित रावहाटे यांच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा आहे. या सगळ्यांनी आपल्या सांघिक कामगिरीने देशासाठी अविस्मरणीय विजयश्री खेचून आणली आहे. या यशात खेळाडुंच्या मेहनतीसह, त्यांच्या कुटुंबियांचे पाठबळ महत्वपूर्ण आहे. या सर्वांचे मनापासून अभिनंदन आणि खेळाडूंच्या भावी वाटचालीस हार्दिक शुभेच्छा, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी संदेशात म्हटले आहे.

## उमरीत पतंजलीचे स्वामी यज्ञदेव महाराजांचे भव्य योग व यज्ञ प्रशिक्षण शिबीर संपन्न

लोकनेता न्युज नेटवर्क
उमरी/ किशन गायकवाड

उमरी : शहरातील मोंढा मैदानावर ७ दिवसीय भव्य दिव्य योग विज्ञान,यज्ञ एवंम ध्यान शिबीर संपन्न झाले. ज्यात हरिद्वारचे संन्यासी पु. स्वामी यज्ञदेवजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली ५१ कुंडी महायज्ञ व प्रशिक्षण देण्यात आले. १३ जानेवारी ते १९ जानेवारी २०२५ दरम्यान पहाटे ५ते ७ पर्यंत मोंढा मैदानावर निःशुल्क भव्य दिव्य योग विज्ञान एवंम ध्यान शिबीर संपन्न झाले. प्रशिक्षणा दरम्यान पतंजली योग समिती जिल्हाध्यक्ष जिल्हाध्यक्ष सुरेश लंगडापुरे , पुसद तालुका प्रभारी प्रकाश वानरे, व सौ. माधुरीताई वानरे , कंधार तालुका प्रभारी निळकंठ मोरे यांनी योग प्रशिक्षण




दिले. शिबिराचे मुख्य आयोजन भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेश सचिव डॉ.अमोल पा.ढगे यांनी केले होते. ह्या शिबिरा दरम्यान दररोज ८ प्रकारचे प्राणायाम, ४२ प्रकारची बैठे,खडे,हाथ-पायाचे आणि पाठ व पोटावरचे सर्व कठीण- सामान्य आसने,सूर्यनमस्कार , योगीक जॉगिंग ,१२ प्रकारचे तरुणांसाठी दंड आसने-बैठक,ध्यानधारणा याचे विशेष



प्रशिक्षण देण्यात आले. सर्व योग साधकांना दररोज विविध प्रकारचे ज्यूस मोफत देण्यात आले. यासाठी गोविंद अट्टल, शंकरराव माली पाटील, गंगाधर पाटील पुयड, आदेश जैन, गणेश मदने,गजानन करखेलीकर आदींचे योगदान लाभले. योग शिबिराच्या समारोपप्रसंगी पतंजली योगपीठ हरिद्वार चे संन्यासी संन्यासी पूजन स्वामी यज्ञदेवजी महाराज यांच्यामध्ये प्रशिक्षण प्रशिक्षण यशस्वीरित्या पार पडले. यावेळी १०० योग साधक महिला पुरुषांनी पांढरे वस्त्र परिधान करून यज्ञ प्रशिक्षण घेतले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी बालाजीराव येरावार, गंगाधर पाटील पुयड, गोविंदसेठ अट्टल, डॉ.अविनाश पा.ढगे, केदार चिटमलवार,गणेश चव्हाण,प्रल्हाद पाटील जोगदंड,पंडितराव बेंबरे,चव्हाण बुध्दाजी,गजानन करखेलीकर,गणेश देवराये गुरुजी,करखेलीकर गजानन, अक्कलवाड गणेश,गणेश मदने, कमलाकांत उत्तरवार, माधव जंगेवाड, गंगाधर कस्तुरे,विद्याताई अग्रवाल, करुणा खंडेलोटे, सुरेखा गोकावार ,कविता हामंद, विजयमाला ताटीकुंडलवार,गोदावरी धानोरकर,रेणुका भुजबळे,विजया राउलवार,शकुंतला चव्हाण आदिसह परिश्रम घेतले.

## इमानदारीने काम करायचे असेल तरच काँग्रेस पक्षात रहा :- तिरुपती पा.कोंढेकर




लोकनेता न्युज नेटवर्क मालेगाव संदीप कदम

नायगाव येथे नांदेड जिल्हा काँग्रेस कार्यकर्ता मंथन बैठक पार पडली यात भोकर विधानसभेचे नेते पप्पु पाटील कोंढेकर यांनी बोलताना सांगितले लोकशाही वाचवण्यासाठी , सर्व सामान्यांच्या रक्षणासाठी आपल्याला ठामपणे काँग्रेस पक्षा सोबत राहावे लागेल.लोकसभा पोट निवडणुक व विधानसभा निवडणुकीत प्रामाणिक पणें काम करणा-या कार्यकर्त्याला येणा-या स्थानिक स्वराज्य संस्थे मध्ये संधी देण्याचे काम केले जाईल. कार्यकर्त्यांना प्रत्येक जागी ताकत देण्याचे काम येणा-या काळात केले जाईल असे त्यांनी सांगितले ज्यांना पक्षाचे काम इमानदारीने करायचे नाही अशांनी आताच पक्षातून बाहेर जावे असा रोकठोक सल्ला ही त्यांनी दिला....! प्रतिनिधी.सदीप कदम बामणीकर इमानदारीने काम करायचे असेल तरच काँग्रेस पक्षात रहा :- तिरुपती (पप्पु) पाटील कोंढेकर नायगाव येथे नांदेड जिल्हा काँग्रेस कार्यकर्ता मंथन बैठक पार पडली यात भोकर विधानसभेचे नेते पप्पु पाटील कोंढेकर यांनी बोलताना सांगितले लोकशाही वाचवण्यासाठी , सर्व सामान्यांच्या रक्षणासाठी आपल्याला ठामपणे काँग्रेस पक्षा सोबत राहावे लागेल.लोकसभा पोट निवडणुक व विधानसभा निवडणुकीत प्रामाणिक पणें काम करणा-या कार्यकर्त्याला येणा-या स्थानिक स्वराज्य संस्थे मध्ये संधी देण्याचे काम केले जाईल. कार्यकर्त्यांना प्रत्येक जागी ताकत देण्याचे काम येणा-या काळात केले जाईल असे त्यांनी सांगितले ज्यांना पक्षाचे काम इमानदारीने करायचे नाही अशांनी आताच पक्षातून बाहेर जावे असा रोकठोक सल्ला ही त्यांनी दिला....!कुणाकडे कोणत्या जिल्ह्याचं पालकमंत्री? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे नक्षलग्रस्त जिल्हा अशी ओळख असलेल्या गडचिरोली जिल्ह्याची जबाबदारी आहे. तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे ठाणे आणि मुंबई शहराचे पालकमंत्री असणार आहेत. तसेच दुसरे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे पुणे आणि बहुचर्चित बीड जिल्ह्याची जबाबदारी देण्यात आली आहे.

## वाघलवाडा येथे नवीन कारखाना उभारणी संदर्भात कवळे गुरुजी यांचा विचार विनिमय गावभेट दौरा....

लोकनेता न्युज नेटवर्क
नांदेड बाजीराव गायकवाड

आपणास कळविण्यात येते शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी यांनी या भागातील शेतकरी हा आर्थिक दृष्टीने संपन्न झाला पाहिजे या उद्देशाने वाघलवाडा येथे नवीन कारखाना लवकर उभारण्यासाठी मायबाप शेतक-यांचे विचार घेण्यासाठी आपल्या गावात दि २१ जानेवारी २०२५ पासून खालीलप्रमाणे दौरा ठेवला आहे



तरी व्हीपीके परिवारातील त्या त्या गावातील कर्मचारी बांधव तसेच गावातील प्रमुख व्यक्तीने उपस्थित राहून सहकार्य करावे विनंती केली आहे. नियोजित दौरा पुढील प्रमाणे आहे रहाटी सकाळी ०७:०० वा ,भायेगाव सकाळी ०८:०० वा ,इळेगाव गं.पं सकाळी ०९:०० वा हांगीरगा सकाळी १०:०० वा , सायंकाळी चा दौरा इज्जतगांव आबादी सायं. ०५:०० ,इज्जतगांव पट्टी सायं ०६:०० , मनूर सायं ०७:०० वा , इज्जतगाव बर्डी ०८:०० वा तरी आपण वेळातला वेळ काढून जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून आपला हातभार लावावा अशी विनंती ऊस उत्पादक शेतक-यांना मारोतराव पाटील कवळे गुरुजी चेअरमन व्हीपीके उद्योग समूह नांदेड यांनी केली आहे.

## कुंडलवाडी पोलिस ठाण्याच्या पोलीसांनी पकडला गूटखा



लोकनेता न्युज नेटवर्क कुंडलवाडी गंगाधर दुसलवाड

कुंडलवाडी येथील पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध गुडघ्याची वाहतूक करीत असलेल्या एका इसमास कुंडलवाडी पोलिसांनी दिनांक १८ रोजी पकडून त्यांच्याकडील ८२६७१ रुपयाच्या मुद्देमाल जप्त केला कुंडलवाडी गुटखा माफीयावर पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार पोलीस उपविभागीय अधिकारी प्रशांत संपते यांच्या आदेशानुसार सैराट धाडसत्र सुरू केले त्यांच्या अनुषंगाने दिनांक १८ रोजी डोर मार्ग नायगाव कडे अवैधरित्या गुटखा वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळल्यावर सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे पोलीस उपनिरीक्षक नारायण शिंदे बीट जमादार शंकर चव्हाण पोलीस अंमलदार देशमुख आर्दीनी तक्रार घटनास्थळी पोचवून श्रीनिवास भाऊ रावसाहेब देगाव राहणार सालेगाव तालुका धर्माबाद त्यांच्याकडून ३२६७१ रुपयाचा अर्वेध गुटखा व ५० हजार रुपयाची मोटर सायकल असा एकूण ८२६७१ मुद्देमाल जप्त केले सदरील इसमावर गुन्हे दाखल करण्याची सुरू असल्याची माहिती सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांनी दिली आहे

## टेळकी येथे परंपरागत शेंद्रिय शेतीचे प्रशिक्षण संपन्न !

लोकनेता न्यूज नेटवर्क
लोहा /विशाल घंटे

जिन्ह्यातील लोहा व माहूर तालुक्यात शेंद्रिय शेतीतील गटाना प्रोत्साहन म्हणून विविध प्रकारे शेंद्रिय शेती करणा-्या गटांना प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते यामध्ये शेंद्रिय पद्धतीने निविष्टा व इतर बाबी करिता प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येते . या अंतर्गत कृषी प्रधान शेंद्रिय शेतकरी प्रडुसर कंपनीच्या वतीने लोहा तालुक्यातील टेळकी येथे शेंद्रिय शेती करणा-या शेतकरी गटांना प्रशिक्षण आयोजित करण्यात आले. यावेळी शेंद्रिय शेती विषयक अनेक मान्यवर शेतकरी बांधवानी आपले मनोगत व्यक्त केले त्यामध्ये अंकूश



चन्नापूरे ,आनंदा पाटील जाधव, रत्नाकर पाटील ढगे, कृषी प्रधान शेंद्रिय शेतकरी प्रडूसर कंपनीचे तज्ञ प्रशिक्षक भुमरे यांनी उपस्थित शेतकरी बांधवांना शेंद्रिय शेती विषयक मोलाचे मार्गदर्शन केले यावेळी शेंद्रिय शेती करणा-्या शेतकरी बांधवांनी निविष्ठा तयार करण्यासाठी फायबर टाकीचे वाटप करण्यात आले तर बाकी शिल्लक राहिलेल्या शेतकरी गटाना दोन दिवशात टाकीचे वाटप करण्यात येईल असे कृषी प्रधान शेंद्रिय शेतकरी प्रडूसर कंपनीचे अध्यक्ष रत्नाकर पाटील ढगे यांनी सांगितले तर परंपरागत शेद्रिय शेती गटांना मानव संसाधन अतंर्गत गाडूळ खत युनिट अनुदानावर बांधकाम इस्टीमेट तयार करून करावे अशी माहिती जिल्हा कृषीअधिक्षक यांनी पत्राद्वारे दिली आसल्यांची माहिती ढगे यांनी दिली यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष सौ वनितातार्ई मोरे यांनी शेती विषयक आपले मनोगत व्यक्त केले तसेच गावात वण्य प्राणी वानर यांचा मोठा त्रास टेळकी गावातील शेतकरी यांना सहन करावा लागत आहे त्यामुळे सदरिल गावातील घरावर पण वानर उडया मारत असून उपद्रव करत आहेत या बाबीची योग्य दखल वन विभागाने घेऊन वानराचा बंदोबस्त करावा अशी मागणी वनितातार्ई मोरे यांनी केली यावेळी पाणी फाउंडेशनचे कदम भिसे यांनी मोलाचे मार्गदर्शन उपस्थित शेतकरी बांधवांना केले. यावेळी दशपर्णी अर्क व इतर शेद्रिय पध्दतीने तयार होणा-्या औषधाचे प्रात्याक्षिके कृषी प्रधान शेंद्रिय शेतकरी प्रडुसर कंपनीचे तज्ञ प्रशिक्षक दशरथ भुमरे यांनी शेतकरी बांधवांना करून दाखवले यावेळी कृषी प्रधान कंपनीचे संचालक हिरामण मोरे, देविदास मोरे, अमृता मोरे, संभाजी पाटील शिंदे, सुनील हंबर्डे,ज्ञानेश्वर येवले, चैतालीताई मोरे, पत्रकार गणपत जामगे सह गावातील शेतकरी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते,

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटातील नवनिर्वाचित कार्यकर्त्यांचा सत्कार संपन्न



लोकनेता न्युज नेटवर्क
उस्माननगर प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गट शिर्डी येथे पक्ष सोहळा आयोजित केला होता यावेळी शिवसेना सहसंपर्कप्रमुख अँड मुक्तेश्वरभाऊ धोंडगे याच्या सह अनेक खंदे समर्थकासह पक्ष प्रवेश केला त्यानंतर कलंबर सर्कलच्या वतीने दिगंबर पाटील इंगोले सरपंच प्रतिनिधी लाठ खु शिवसेना उप तालुकाप्रमुख तिरुपती पाटील घोरबांड यासह अनेक कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या नेतृत्व विश्वास ठेवून पक्षप्रवेश केला आहे त्याचा सत्कार करताना गगांधर पाटील घोरबांड विठ्ठल पाटील घोरबांड आनंदराव पाटील मोरे दिलिप पा घोरबांड नारायण पा घोरबांड अशोकराव मुद्दमवाड गुरु घोरबांड आदी मान्यवर उपस्थित होते

## भगवान महाविद्यालयात मवाचन संकल्प महाराष्ट्राचाफ कार्यक्रम संपन्न

लोकनेता न्युज नेटवर्क आष्टी(अण्णासाहेब साबळे) महाराष्ट्र शासन आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या निर्देशानुसार वाचन संकल्प महाराष्ट्राचा डलहेश्र उेपपशलीं २.० या उपक्रमांतर्गत दिनांक १ ते १५ जानेवारी २०२५ या कालावधीत भगवान महाविद्यालयात प्राचार्याच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली.यामधे प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ,ग्रंथपाल श्री नंदकिशोर धोंडे,राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ.अशोक देवकर, हिंदी विभाग प्रमुख डॉ.अप्पासाहेब टाळके,मराठी विभाग प्रमुख डॉ.बाळासाहेब गावडे,इंग्रजी विभाग प्रमुख डॉ.शिवाजी पवार यांचा समावेश करण्यात आला.यामधे पंडित जवाहरलाल नेहरू कनिष्ठ महाविद्यालय,आष्टी यांच्या संयुक्तपने प्रथमतःग्रंथालय स्वच्छता करून सामूहिक वाचन घेण्यात आले. तसेच मलेखक-वाचक संवादफ हा कार्यक्रम घेण्यात आला.यामधे लेखक डॉ. अप्पासाहेब टाळके यानी सविस्तर मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.यानंतर प्रसिद्ध वक्ते श्री राजेश चव्हाण यानी वाचन कौशल्य कार्यशालेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयात विद्यार्थ्यात वाचनाची गोडी निर्माण व्हावी म्हणून ग्रंथ प्रदर्शन घेण्यात आले.या संपूर्ण कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय वाघ यानी मराष्ट्रीय शैक्षणिक धोरणफ या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. हे सर्व कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी समितीतील सर्व सदस्य व महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.अप्पासाहेब टाळके,डॉ.ज्ञानदेव वैद्य,ग्रंथालय सेवक श्री पांडुरंग साबळे व प्रा. काकासाहेब सोले यानी परिश्रम घेतले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904